# महाराष्ट्र न्यायिक अकादमी व
# भारतीय मध्यस्थी केंद्र आणि प्रशिक्षण संस्था
उत्तन—गोराई रोड, उत्तन, भाईंदर (प.), जि. ठाणे — ४०१ १०६

**गिरीश रा. अग्रवाल**
**सहसंचालक**

दुरध्वनी क्रमांक : ८४३३९९०१०१
ई—मेल : mjauttsc@aij.gov.in


जा.क्र.मन्याअ/उत्तन/438 /२०२५ दिनांक : २४/०२/२०२५

## दरपत्रक निवेदन

अकादमीतील तीनही बंगल्याच्या खिडक्यांना नविन ॲल्युनीयम फ्रेम आणि स्टीलची मच्छर जाळी बाहेरून बसविणे आहे. तरी इच्छुक कंत्राटदार यांनी प्रत्यक्ष पाहणी करून त्यासाठी लागणारे साहित्य आणि मजुरीचे दरपत्रक बंद पाकीटातून उपसंचालकांच्या कार्यालयामध्ये दि. ३.०३.२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत सादर करावेत.

**अटी व शर्ती** :—

१. संबंधीत कंत्राटदार यांनी स्वत:च्या लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर ‘अकादमीतील बंगल्यांच्या खिडक्यांचे मच्छरजाळीचे दरपत्रक’ असे नमूद करावे. सदरचे दरपत्रक ‘महाराष्ट्र न्यायिक अकादमी, उत्तन—गोराई रोड, उत्तन, भाईदर पश्चिम—४०११०६’ या पत्त्यावर पोस्टाने किंवा प्रत्य क्षात येउन कार्यालयामध्ये दि. ३.०३.२०२५ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत सादर करावे. त्यानंतर आलेले दरपत्रक कोणत्याही कारणास्तव विचारात घेतले जाणार नाही.

२. दरपत्रकामध्ये वस्तू व सेवा कर समाविष्ट आहे किंवा नाही याचा स्पष्ट उल्लेख करावा.

३. दरपत्रकांमध्ये येणे जाण्याचा खर्च तसेच सामान आणण्याचा खर्च, आवश्यकता असल्यास स्पष्टपणे नमुद करावा.

४. दरपत्रक स्विकारणे किंवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार कार्यालयीन प्रमूखास राहिल.

५. दरपत्रक सादर करण्यापुर्वी खिडक्यांचे डिझाईन व सामानाचे नमुने अकादमीच्या कार्यकारी समितीच्या पंसतीसाठी व मंजुरीसाठी स्वखर्चाने आणावेत व परत घेवुन जावे.

६. कार्यकारी समितीने पसंत करून मंजुर केलेली डिझाईन व साहित्य वापरणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. तसेच लागणारे साहित्यांचा पुरेसा साठा उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

७. दरपत्रक प्राप्त झाल्यानंतर खिडक्यांचे जाळीचा दर्जा आणि साहित्याचे नमुने याला प्राधान्य देण्यात येईल.

८. जागेची पाहणी व मोजणी सकाळी ९.३० ते दुपारी ४.३० या दरम्यान करता येईल. (गुरूवार साप्ताहिक सुट्टीचा दिवस सोडून.)

दिनांक : २४/०२/२०२५

(गिरीश अग्रवाल) 24.2.25
सहसंचालक
महाराष्ट्र न्यायिक अकादमी व
भारतीय मध्यस्थी केंद्र आणि प्रशिक्षण संस्था